१८/४/०२ पुढारी

# ताराराणी विद्यापीठात
# कै. व्ही. टी. पाटील यांची जयंती

कोल्हापूर, दि. १८ : ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक कै. डॉ. व्ही. टी. पाटील यांची १०२ वी जयंती ताराराणी विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे सचिव व कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी व्ही. टी. पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

प्राचार्य डॉ. पाटील यांचे व्ही. टी. पाटील यांच्या कार्याविषयी भाषण झाले. यावेळी आयोजित रक्तदान शिबिरात ४० विद्यार्थिनींनी रक्तदान केले.